# अगा त्यांचे भय

## चन्द्रशेखर पुरन्दरे

**प्रगतीतून आलेली समृद्धी हे जसं पाश्चिमात्य जगाचं एक वास्तव आहे, तसंच एक वास्तव आहे. समाजात खोलवर पसरलेली भयग्रस्तता! या समाजात दहशतवादाचं भय अगदी अलिकडचं आहे, मात्र इथली सामूहिक भीतीची भावना त्या आधीपासून आहे. ही भयग्रस्तता कशातून आली आहे? या भयाचंही भांडवल कशाप्रकारे केलं जातं? लेखकानं त्याच्या इंग्लंडमधील दहा वर्षांच्या वास्तव्याच्या अनुभवातून या प्रश्नांचा घेतलेला मागोवा.**

इंग्लंड-अमेरिकेविषयी आपल्याकडे लोकांमध्ये खूप कुतूहल आहे. किंबहुना 'इंग्लंड-अमेरिका' ही एक संकल्पनाच झाली आहे. प्रगती, सामाजिक शिस्त वगैरेंचा आदर्श म्हणून आपण वारंवार या संकल्पना वापरत असतो. ब्रिटनमध्ये माझं गेली दहा वर्षं वास्तव्य आहे. युरोप-अमेरिकेत मी फिरलो आहे. अलीकडच्या काळात या देशांनाही आतंकवादाचे धक्के बसले आहेत. या पार्श्वभूमीवर तिथल्या समाजामध्ये पसरलेलं भय मला जाणवलं आहे. भारतात असताना, पंजाबात जेव्हा आतंकवाद जोमात होता, तेव्हा मी तिथं प्रवास केला आहे. हैदराबाद हिंदू-मुस्लिम दंगलीने ग्रासलेले असताना मी तिथं होतो. ईशान्य भारतात (त्रिपुरा, मणिपूर, आसाम वगैरे राज्यं) भारतीय लष्कर आणि स्थानिक फुटीरतावादी चळवळी यांच्यातील चकमकींच्या दरम्यान मी तिथं राहिलो आहे. वास्तविक या प्रदेशांमध्ये त्या-त्या काळात सामूहिक भीती निर्माण होणं न्याय्य आणि समजण्यासारखं होतं. पण पश्चिमेत जी सार्वत्रिक भीती मला जाणवते, तशी भीती मला तेव्हा इथं जाणवली नव्हती. पश्चिमेच्या जगाकडे कुतूहलाने पाहताना तिथल्या समाजावरचा भीतीचा अंमल आपल्याकडे फारसा लक्षात येत नाही. तिथली समृद्धी, फॅशन्स, उच्च जीवनमान यांच्या झळाळीचं चित्रं आपल्याला दिसतं. पण या आवरणाखाली समाजाच्या सगळ्या थरांमध्ये झिरपलेली भीत आपल्याला दिसत नाही. वस्तुत: जगाकडे बघण्याचा दृष्टिकोनच विकृत व्हावा अशी भीती, विशेषत: ब्रिटन आणि अमेरिका या देशात 'नॉर्मल' काळातही आढळते. सगळा समाजच सतत कोणत्या तरी दडपणाखाली असल्यासारखा वागत असतो. एलायस कानेती, फॅंक पुरेदी, बॅरी ग्लसनर, नोआम चोम्स्की व इतरही अनेक विचारवंतांनी या भीतीचा अभ्यास केला आहे. पाश्चिमात्य जगात भयाचा अंमल किती मोठा आहे आणि तो कसा वाढत आहे याचं एक उदाहरण देतो. मनोविकारांवर उपचार करून घेणाऱ्यांची संख्या वाढणं आणि त्यांना उपचार देणाऱ्या तज्ज्ञांची संख्या वाढणं, हे वाढत्या भीतीचं परिमाण मानता येईल. १९८० पर्यंत ब्रिटनमध्ये मनोविकारांवर सल्ला देणारे १८०० मनोविकार तज्ज्ञ आणि १६० संस्था होत्या. ९३ साली त्यांची संख्या १०,००० तज्ज्ञ आणि ५०० संस्था एवढी झाली. गेल्या दहा-बारा वर्षांत ती आणखीनच वाढली. ब्रिटनची लोकसंख्या सहा कोटी म्हणजे महाराष्ट्राहून कमी आहे. या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी लक्षात घेतली तर या भीतीची व्यापकता लक्षात येईल.

युरोप-अमेरिकेसारख्या पाश्चात्त्य जगाला आतंकवादाची प्रत्यक्ष झळ गेल्या दशकापासून पोहोचत आहे. पण या समाजात असलेलं सामूहिक भय त्या आधीपासून आहे. त्यामुळेच या समाजातलं हे भय नेमकं काय आहे? त्यामागची मानवनिर्मित कारणं काय आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न हा या लेखाचा उद्देश आहे. पश्चिमेत आर्थिक सुबत्ता आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तंत्रज्ञानामुळे, माहिती आणि संपर्काच्या साधनांमुळे जागतिकीकरणाने अफाट वेग घेतला. दुसऱ्या महायुद्धानंतर बहुतेक देशांत लोकशाही राज्यव्यवस्थाही रूढ झाली. हळूहळू कुटुंबव्यवस्था मोडकळीस निघाली. ही भौतिक परिस्थिती आहे. या परिस्थितीचा भीतीशी काय संबंध असावा ते पाहण्याचा हा प्रयत्न आहे.

नैराश्य, लाज, शरम, अपराधीपणा, न्यूनगंड, अहंगंड, असुरक्षितता या सगळ्या भावना भीतीशी संलग्न असतात. सामाजिक पुरातत्त्वशास्त्रानुसार व सामान्यत:ही पौर्वात्य संस्कृती लाज किंवा शरमेवर आधारित आहे. असं मानलं जातं तर पाश्चिमात्य संस्कृती अपराधीपणावर आधारित आहे, असं मानलं जातं. शरमेला सार्वजनिक संदर्भ असतो. अपराधीपणाला वैयक्तिक संदर्भ असतो. मी एखादं गैरकृत्य केलं आणि ते इतरांना कळलं तर मला शरम वाटते, किंवा शरम वाटणं अपेक्षित असतं. या शरमेची भीती दाखवून माणसाला नीट वागायला पौर्वात्य संस्कृती भाग पाडते. माझी सदसद्‌विवेकबुद्धी या

संस्कृतीने अशाप्रकारे घडवलेली असते. पाश्चात्त्य संस्कृतीत मी एखादं गैरकृत्य केलं तर मला अपराधी वाटतं किंवा अपराधी वाटणं अपेक्षित असतं. असं अपराधी वाटावं अशी माझी सदसद्‌विवेकबुद्धी ती संस्कृती घडवते. याच अर्थ असा नाही की, पूर्वेकडे अपराधीपणा नसतोच किंवा पश्चिमेकडे लाज/शरम नसते. मुद्दा एवढाच की, संस्कृतीच्या पायाभूत मूल्यांचा विचार केला तर पूर्वेकडे शरम आणि पश्चिमेकडे अपराधीपणा यांना जास्त महत्त्व आहे.

माझ्या तेथील वास्तव्यात सुरुवातीला मी हा भीतीचा प्रश्न या अनुषंगाने पाहत असे. या देशांची समृद्धी वसाहतवादातून निर्माण झाली. नंतरच्या काळात तंत्रज्ञानाच्या निर्यातीतून त्यांनी ही समृद्धी कायम राखली आणि आता पूर्वीच्या वसाहती म्हणजे तिसरं जग त्यांना बाजारपेठ म्हणून खुणावत आहे. ही बाजारपेठ काबीज करण्यासाठी त्यांनी जागतिक अर्थसंस्था निर्माण केल्या, त्या संस्थांचे कायदेकानू आपल्याला फायदेशीर राहतील व तिसऱ्या जगाला फायदेशील नसतील असे बनवले. आपली सुबत्ता जगाच्या एका मोठ्या भागाच्या दारिद्र्यावर अवलंबून आहे याची जाणीव इथल्या सामान्य माणसाला खुपत असावी असा माझा तर्क होता. प्रसारमाध्यमांमुळे जग जवळ येण्याच्या प्रक्रियेने तर ही जाणीव वीस वर्षांपूर्वी पेक्षा आज अधिकच तीव्र असावी असं मला वाटे. सामूहिक अपराधीपणाची ही जाणीव हे या सामूहिक भीतीचं एक कारण असावं, असं मला वाटत होतं. त्याचबरोबर आपली आर्थिक सुबत्ता टिकेल का, हा विचारही दुसरं महत्त्वाचं कारण असावं, असं मला वाटे. जागतिक अर्थकारणाची अनिश्चितता, पर्यावरणाची हानी, चीन-भारतासारख्या नव्या महासत्तांचा उदय अशी पोषक परिस्थितीही त्यासाठी होती.

पण काही काळातच प्रत्यक्ष अनुभवातून भीतीची ही प्रमुख कारणं नाहीत याची मला खात्री पटली. अपराधी वाटण्यासाठी आधी या जागतिक संदर्भाची, घडामोडींची माहिती तर हवी. विकसित पाश्चात्त्य देशांतील सामान्य माणसाचं 'सामान्यज्ञान' खरोखरच धक्कादायक असतं. मी, माझं कुटुंब, माझा प्रांत या पलीकडे या माणसाची भौगोलिक आणि मानसिक जाणीव जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आपल्या संपन्नतेची पाळंमुळं शोधण्याचा प्रयत्न दूरच. मुळात आपल्याला तहहयात अन्न-वस्त्र निवाऱ्याची ददात नाही. ही चैन आहे याचीच तिथं जाणीव नाही. जगात १०० कोटी लोकांना आयुष्यभर दोन वेळा पुरेसं खायला मिळत नाही, हेच त्यांना माहीत नसतं. त्यामुळे ही परिस्थिती यायला आपल्या व्यापारी कंपन्या, आपलं सरकार आणि अप्रत्यक्षरीत्या आपण कसे जबाबदार आहोत या गोष्टींची जाणीव त्यांना नसते. त्यांना जी 'माहिती' असते त्याला 'ज्ञान' म्हणता येणार नाही. नोकरी-व्यवसायाला आवश्यक ती तांत्रिक माहिती, एखाद-दुसरा छंद, सुटीसाठी पैशानुसार जाण्याचं ठिकाण ही इथल्या सामान्य माणसांची 'ज्ञान'व्यवस्था असते. तिचा आणि बाहेरचं खरं जग यांचा फारसा संबंध नसतो.

'भारतात उन्हाळा फार असतो' या पलीकडे त्यांची मजल जात नाही. उन्हाळ्यावरून झालेलं एक संभाषण आठवतं. एका अतिउच्चशिक्षित गृहस्थांशी बोलताना त्यांनी पृच्छा केली. 'भारतात इतका उन्हाळा असतो तर एअर कंडिशनर्स किती असतील?' भारतात गरीब लोकांना, अगदी मध्यमवर्गीयांना सुद्धा एअर कंडिशनर्स परवडत नाहीत, असं मी त्यांना सांगितलं. त्यावर त्यांनी सुस्कारा टाकला. ते पुढे म्हणाले, 'मी तोच विचार करत होतो - १०० कोटी लोकसंख्येच्या देशात प्रत्येकाकडे जर एअरकंडिशनर्स असतील, तर पर्यावरणाची ग्लोबल वॉर्मिंगने किती हानी झाली असती...' या अज्ञानापुढे मी हताश झालो होतो. ज्या देशात ३८ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, त्या देशातल्या गरीबांची काळजी न करता एअर कंडिशनर्स व त्यानं होणारी पर्यावरणाची हानी याची त्यांना काळजी लागली होती.

समृद्धी आणि सामाजिक भान यांचा फारसा संबंध नसावा, हेही या उदाहरणावरून स्पष्ट होतं.

त्यामुळे अपराधीपणा हे भीतीचं कारण नाही हे लक्षात आल्यावर न्यूनगंड हे या भीतीचं कारण असू शकेल का, या दृष्टीने मी या समाजाकडे, विशेषत: ब्रिटिश समाजाकडे पाहू लागलो. आपल्याकडे अस्पृश्य जाती, अमेरिकेत कृष्णवर्णीय, युरोपमध्ये जिप्सी यांना शतकानुशतके समाजाने हीन मानलं, तुच्छतेने वागवलं किंवा आजही कृष्णवर्णीय आणि अरब यांना पश्चिम युरोपात सापत्नभावाने वागवलं जातं. त्याचा परिणाम म्हणून समाजाचा वर्ग इतर समाजाला घाबरून वागतो. तात्पर्य, सामूहिक न्यूनगंड भीती निर्माण करू शकतो. अलीकडचं उदाहरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धातील आक्रमक भूमिकेमुळे आणि ज्यूंचं शिरकाण करण्याच्या धोरणामुळे जर्मन लोकांना आजही अपराधीपणा आणि न्यूनगंड वाटतो. त्यांच्या जगाबरोबर, आंतरराष्ट्रीय राजकारणात वागण्याच्या पद्धतीवर या न्यूनगंडाचा परिणाम दिसतो.

एकूण युरोपात ब्रिटिशांबद्दल तुच्छता आढळते. त्याचं एक संभाव्य कारण म्हणजे ब्रिटिशांचं सांस्कृतिक मागासलेपण. त्यांनी जागतिक संस्कृतीत स्वत:ची अशी खास भर घातलेली नाही. वाङ्‌मय, तत्त्वज्ञान, संगीत, चित्रकला, शिल्पकला अशा सांस्कृतिक क्षेत्रात फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन, ऑस्ट्रिया (अगदी रशियासुद्धा) या देशांनी जगाला काहीतरी बहुमोल वारसा दिलेला अहो. एक शेक्सपिअर सोडता आणि

लोकशाहीच्या शोधाचा दिंडोरा सोडता ब्रिटिश त्यामानाने सांस्कृतिकदृष्ट्या पश्चिम युरोपपेक्षा मागासलेले आहेत. या न्यूनगंडामुळे तो समाज परक्यासमोर लगेच आक्रसतो, एका कोषात जातो. अधिक विचारांती मात्र मी या निर्णयाप्रत आलो की, या समाजाचा हा संकोच न्यूनगंडामुळे समजू शकतो, पण त्यामुळे भीतीचा उलगडा होणं कठीण आहे.

निर्विवेकीकरणाकडे वाटचाल

अपराधीपणा आणि न्यूनगंड या दोन घटकांचा वेध घेताना या समाजात चालू असणारी एक महत्त्वाची प्रक्रिया मला दिसून आली. 'आत्मो हि आत्मनो बंधु: आत्मो हि रिपुरात्मन:।' या नात्याने ही भीती अंतर्गत कारणांनीच असावी, या तर्काला पुष्टी देणारी ही प्रक्रिया. तिला आपण 'निर्विवेकीकरण' म्हणू. म्हणजे विवेकाचा हळूहळू अस्त होणं. महत्त्वाचं काय आणि बिनमहत्त्वाचं काय याचा सारासार विचार करण्याची क्षमता या अर्थाने मी 'विवेक' ही संकल्पना वापरत आहे. ही क्षमता हा समाज गमावत चाललेला आहे. त्यामुळे फालतू गोष्टींना अतोनात महत्त्व मिळतं आणि महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होतं.

आपली उपजीविका सांभाळण्यासाठी लागणारं ज्ञान मिळवावं आणि बाकी गोष्टी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांवर सोपवाव्यात अशी या समाजाची वृत्ती दिसते. आर्थिक व्यवहार, वैद्यकीय उपचार याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेणं समजू शकतं. म्हणजे मला महिना दहा-पंधरा हजार रुपये जास्तीचे मिळतात, त्याची गुंतवणूक कशी करावी हे मला कळत नाही, म्हणून मी त्या विषयातील तज्ज्ञांचा सल्ला घेतो किंवा माझ्या शरीराचे व्यवहार मला कळत नाहीत, म्हणून दुखण्यावर वैद्यकीय उपचार करून घेण्यासाठी मी डॉक्टरकडे-तज्ज्ञांकडे जातो. ही गरज ठीक आहे, पण जीवनाच्या सगळ्याच क्षेत्रात या समाजाने तज्ज्ञांचं अतिक्रमण ओढवून घेतलं आहे. त्यातून जनमानसाचा एकूण कल आपण असहाय आहोत आणि आपल्या आयुष्यातील गोष्टींची जबाबदारी घ्यायला असमर्थ आहोत, या भावनेत विकृत आनंद घेण्याकडे दिसतो. त्याला प्रमुख कारण म्हणजे राज्यसंस्था. ब्रिटनमधील राज्यसंस्था दाईसारखी झाली आहे, हे सर्वमान्य मत आहे. लहान मुलांचं संगोपन करायला दाई असते, तशी या अजाण, दुबळ्या प्रजेसाठी राज्यसंस्था हजर असते. बेरोजगारांना हप्ता, राहायला घर, एकट्या मातांना - त्यांच्या मुलांना मदत, फुकट रुग्णसेवा अशा विविध प्रकारे सरकार जनतेला सांभाळत असते.

त्यामुळे जरा खुट्ट झालं की, या मायबाप सरकारकडे धाव घेण्याची या समाजाला सवय लागली आहे. त्यात आजवर राष्ट्रीय पातळीवर सरकारच्या बरोबरीच्या दोन प्रमुख संस्था होत्या. चर्च आणि कामगार संघटना. सामान्य माणूस चर्चचा, कामगार संघटनेचा अथवा दोहोंचाही सक्रिय सभासद असे. त्याची अस्मिता घडवण्यात या दोन्ही संस्थांचा सहभाग असे. आपली सामाजिक म्हणून काहीतरी एक जबाबदारी असते, या समाजाला-बाहेरच्या जगाला आपण काही देणं लागतो, ही भावना जोपासली जात असे. या दोन्ही संस्थांचा आणि कुटुंबव्यवस्थेचा अलीकडच्या काळात लय झाला आहे. या पोकळीची जागा सरकारने घेतली आहे. (काही प्रमाणात स्वयंसेवी संघटनांनीही घेतली आहे.)

या एकूण परिस्थितीचा परिणाम म्हणजे स्वत:ची निर्णयक्षमता कमी होणं. पर्यायाने विवेक कमी होणं. विवेक कमी होण्याचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे वैयक्तिक आयुष्यातही निर्णय घेण्याची स्वत:ची कुवत आहे हाच आत्मविश्वास ढळतो. दुसरा अर्थ म्हणजे, विवेक हा वैयक्तिक आणि नजीकच्या जगापुरता, अक्षरश: भौगोलिकदृष्ट्या मर्यादित राहतो. या समाजात एखादी मुलगी शाळेतून येताना बेपत्ता झाली, तर देशभर ती प्रमुख बातमी होते. एखादा रुग्ण हॉस्पिटलच्या बेपर्वाईने मेला, तर देशभर संतापाची लाट येते. चौकशी आयोग नेमले जातात. पण या छोट्या जगाबाहेर याहून फार मोठे अत्याचार हरघडी होत आहेत, याचं या समाजाला सोयरसुतकही नसतं. हे निर्विवेकीकरण. कोणाचा तरी फायदा होत असल्याखेरीज समाजाची ही निर्विवेकीकरणाची प्रक्रिया चालू ठेवली जाणार नाही, ही उघड गोष्ट आहे. या प्रक्रियेचा फायदा अनेक संस्थांना नक्कीच होतो. सरकारला होतो, प्रसारमाध्यमांना होतो, उद्योगधंदे-धार्मिक संघटना-न्यायसंस्था यांनाही होतो. कसा?

भीतीच्या मागचं राजकारण

या भीतीचा फायदा सरकारला कसा होतो ते प्रथम पाहू.

'लोक प्रेमाला प्रतिसाद देत नाहीत, भीतीला देतात' हे अमेरिकेचे माजी अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांचं तत्त्व होतं. त्यांची कारकीर्द या तत्त्वानुसार साकारली. जनमानसात भीती कायम ठेवली, की आपल्याला हवे ते निर्णय लोकांवर लादणं सोपं जातं. हा त्याचा अर्थ. मुळात एक गोष्ट सतत ध्यानात ठेवायला हवी, ती म्हणजे सरकार ही संस्था पश्चिमेत आपल्यापेक्षा फार प्रबळ आणि सर्वस्पर्शी असते. म्हणायला व्यक्तिस्वातंत्र्य असलं, तरी ते एका अगदी अरुंद मर्यादेत शक्य असतं. गुन्हेगारीचं अल्प प्रमाण, सामाजिक सुरक्षिततेची हमी असे या पट्टीत राहण्याचे फायदे असल्याने सामान्य माणूसही त्याबाबत आक्षेप घेत नाही.

त्यामुळे भीतीचा वापर करून जनतेवर निर्णय लादले जातात. अमेरिका आणि ब्रिटन दोघांनी २००३ ला इराकवर युद्ध लादण्यासाठी भीतीचा असाच उपयोग करून घेतला होता.

या युद्धात अमेरिकेची साथ देण्याविरुद्ध ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणात जनमत होतं. युद्धाआधी लंडनमध्ये अपवादात्मक सामाजिक सहभाग म्हणावा असा वीस लाखांचा अभूतपूर्व मोर्चा संभाव्य युद्धाला विरोध करण्यासाठी निघालाही होता. म्हणूनच युद्धाआधी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी 'इराककडे मोठ्या प्रमाणावर नरसंहार करणारी क्षेपणास्त्रं आहेत आणि ती लंडनवर कधीही धडकू शकतात', असं बेजबाबदार विधान केलं होतं. हे विधान अर्थातच खोटं होतं. इराककडे ही क्षमता नव्हती, हे नंतर सिद्धही झालं. पण विरोधकांच्या मनात संदेह निर्माण करणं आणि लोकांच्या मनात भीती निर्माण करून 'युद्धाला पर्याय नाही' हा निर्णय लादणं हा हेतू यशस्वी झाला.

अमेरिकेचे इराक युद्धामागचे उद्देश वेगळे होते, पण ११ सप्टेंबर २००१ ला वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला आणि अमेरिकेत घबराट पसरली. त्याचा पुरेपूर फायदा ते सरकार आजही घेत आहे. सप्टेंबरच्या त्या घटनेनंतर ऑक्टोबरमध्ये एक प्रकारची विशिष्ट जंतू असणारी पावडर पाकिटातून लोकांना पोस्टाने पाठवण्याचं सत्र सुरू झालं होतं. दोन खासदार, टीव्ही कंपन्यांची काही कार्यालये यांना अशी पाकिटं मिळाली होती. मग वॉशिंग्टन परिसरातून एकामागून एक गूढ खून होऊ लागले. (त्यांचा संबंध अतिरेक्यांशी नव्हता.) प्रसारमाध्यमांनी हे अतिरेक्यांचेच उद्योग असल्याचा निर्वाळा दिला होता. अशा भयग्रस्त वातावरणात अफगाणिस्तानावर अल्-कईदा आणि ओसामा बिन लादेन यांचा नायनाट करण्यासाठी अमेरिकेने हल्ला केला. इराक युद्धासाठी अमेरिकन सरकारने जनतेला सांगितलेली कारणं आणि खरी कारणं निराळी होती. (तेलावर नियंत्रण, मध्यपूर्वेत प्रवेश वगैरे खरी कारणे. पण तो या लेखाचा विषय नाही) आपल्या देशाला मुस्लिम अतिरेक्यांकडून असणारा धोका आणि त्याची भीती याचा फायदा मात्र अमेरिकन सरकारने घेतला आणि इराकवर हल्ला चढवला. इराक युद्धाआधीची ही भीती काही विशिष्ट उद्देशाने पसरवण्यात आली होती. ती अर्थातच हेतुपुरस्सर निर्माण करण्यात आलेली होती.

आता पश्चिमेकडील देशांमध्ये प्रसारमाध्यमं आणि सरकार यांचे संबंध व दोघांचा भीतीतील सहभाग पाहू या.

वर्तमानपत्रं, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट ही सध्याची प्रसारमाध्यमं. नव्या बातम्यांची त्यांची भूक भस्म्या रोग लागल्यासारखी कधीच न शमणारी असते. माध्यमांची मालकी खासगी असते. कोण जास्त सनसनाटी बातमी आधी देतो, याची स्पर्धा असते. जाहिराती हा त्यांचा पैसा मिळवण्याचा प्रमुख स्रोत. जेवढे जास्त लोक कार्यक्रम पाहतील, तेवढ्या जास्त लोकांपर्यंत जाहिरात पोहोचते. ताजी बातमी एखादं चॅनेल देऊ शकलं नाही, तर त्या चॅनेलवरच्या जाहिरातीही बघितल्या जात नाहीत. मग जाहिरातदार त्या चॅनेलला जाहिराती देणं कमी करतात किंवा बंद करतात. त्यातून पैशाचा ओघ आटतो. हे टाळण्यासाठी त्यांना सतत बातम्या हव्या असतात. बातम्या मोठ्या प्रमाणावर एकगठ्ठा देऊ शकणारी एकच संस्था. ती म्हणजे सरकार. त्यामुळे आवेश काही असो, बातम्यांसाठी प्रसारमाध्यमं प्रामुख्याने जशी सरकारवर अवलंबून असतात, तशीच पैशासाठी जाहिरातदारांवर. सरकारला हे माहीत असतं. त्यामुळे सरकार आपल्या सोयीच्या बातम्या प्रसारमाध्यमांना पुरवतं. जर एखादं चॅनेल सरकारला गैरसोयीच्या बातम्या सतत देऊ लागलं, तर बातम्यांचा त्या चॅनेलला होणारा पुरवठा आखडता घेतला जातो. मग ताज्या बातम्या दुसऱ्या चॅनेलकडे गेल्या, की या चॅनेलचा तेवढा प्रेक्षकवर्ग कमी होतो आणि पर्यायाने जाहिरातीही. सरकार-प्रसारमाध्यमं-जाहिरातदार यांची ही तिहेरी रस्सीखेच पश्चिमेतल्या लोकशाही देशांमध्ये कायम चालू असते. पण त्याचवेळेस आपण सरकारच्या हातचं बाहुलं नाही, आम्ही लोकाभिमुख आहोत हे दाखवण्याचा प्रसारमाध्यमांचा अट्टाहास चालू असतो. त्यात त्यांची उडी कधीकधी जरा जास्तच लांब जाते. मग सरकार 'अशा अफवांवर विश्वास ठेवू नका' अशा प्रकारची स्पष्टीकरणं होतं, प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता तितकी कमी होते. पण बहुधा बातम्यांचा रेटाच एवढा असतो की, जनतेची स्मृती या बातमीपत्रापासून त्या बातमीपत्रापर्यंत मर्यादित ठेवण्यात प्रसारमाध्यमं यशस्वी होतात. या प्रक्रियेचा एक गंभीर परिणाम होतो. गतिमान वर्तमान असंबद्ध आणि तुकड्या-तुकड्यात पुढे वाढलं जातं. त्याचं भूतकाळाशी असलेलं अखंडित नातं जोडलं जातं. त्यामुळे समाजाला घटनांचा संदर्भ राहत नाही. ज्ञानव्यवस्थेसाठी प्रसारमाध्यमांवर सर्वतोपरी अवलंबून असणारा सामान्य माणूस अशा विखंडित विश्वदर्शनाने गोंधळून जातो. तो आपलं जग आपल्या कुटुंबापुरतं मर्यादित करतो, किंवा तज्ज्ञांकडे धाव घेतो अथवा सरकारकडून मदतीची अपेक्षा करतो. या मानसिकतेचा फायदा उठवण्यासाठी साध्या घटनांना बेसुमार फुगवून भीती निर्माण करणं हा उद्योग प्रसारमाध्यमं सतत करताना दिसतात. त्याची काही उदाहरणं अगदी ठळकपणे सांगता येतील.

रोझा पार्क्स ही अमेरिकेतील कृष्णवर्णीय चळवळीची उद्‌गाती. कृष्णवर्णीयांना समान हक्क मिळण्याच्या चळवळीने तिच्यापासून वेग घेतला. अमेरिकन मनामध्ये तिच्याबद्दल मोठं आदराचं स्थान आहे. अलाबामा या कमालीच्या वर्णद्वेषी राज्यात तिनं वर्णभेदाविरुद्ध पहिला अहिंसक निषेध नोंदवला आणि मार्टिन ल्यूथर किंगशी संपर्क साधला. त्यातून कृष्णवर्णीयांची मोठी चळवळ उभी राहिली आणि कृष्णवर्णीयांना गोऱ्यांच्या

बरोबरीने अधिकार मिळाले. रोझा पार्क्स ८१ वर्षांची असतानाचा एक प्रसंग. रस्त्यावरून ती एकटी जात असताना एका भुरट्या पाकिटमाराने तिला लुबाडलं. 'या घटनेला उगाच जास्त महत्त्व देऊ नका' असं तिनं प्रतिपादन केलं. पण या प्रसंगाची सनसनाटी संभाव्यता पाहता प्रसारमाध्यमांनी तो सल्ला ऐकणं अशक्यच होतं. त्यांनी या बातमीचा वापर करून असं काही वातावरण निर्माण केलं की, जणू देशभर अमेरिकन तरुण रस्त्यावर दिसेल त्या वृध्धाला लुबाडतात. प्रत्यक्षात पासष्टीच्या पुढच्या व्यक्तींवर होणाऱ्या अशा हल्ल्यांची संख्या तर वयोगटांच्या तुलनेने अतिशय कमी असते. पंचविशीच्या आतल्या तरुणांवर असे हल्ले वृद्धांपेक्षा सोळापटीने जास्त होतात, अशी तिथली आकडेवारी सांगते.

दुसरं उदाहरण पाहू. अमेरिकेत दरवर्षी सुमारे तीन कोटी शस्त्रक्रिया होतात. त्यातल्या सुमारे शंभर शस्त्रक्रियांमध्ये यांत्रिक बिघाडाने एक धोका संभवतो. रुग्णाच्या चेहऱ्यावर भूल देण्यासाठी बसवलेला प्राणवायूचा मुखवटा पेट घेऊ शकतो, हा तो धोका. मध्यंतरी टीव्हीवर अशा एका घटनेमुळे चेहरा भाजलेली बाई आणि आणखी एका घटनेत दगावलेल्या मुलाचा बाप यांना बोलावण्यात आलं होतं. त्यांच्या वैयक्तिक वेदनेला कमी लेखण्याचा माझा हेतू नाही, पण असे लोक टीव्हीवर आणले की, ही घटना होण्याची शक्यता तीन लाखांत एक इतकी कमी असते, याकडे लोकांचं लक्ष जात नाही. हॉस्पिटल्स् आणि ऑपरेशनची भीती यांचा मात्र उदय होतो.

भीतीचे विविध पैलू

पश्चिमेकडील प्रसारमाध्यमांतून पसरवली जाणारी भीती ही अनेक प्रकारची आहे. उदाहरणार्थ लोकांना पटकन भावतील असे गुन्हेगार निवडून भीती पसरवणं हाही इथल्या प्रसारमाध्यमांचा आवडता छंद आहे. लहान मुलांवरील अत्याचार हा युरोप आणि अमेरिकेमध्ये सध्या मोठ्या चिंतेचा विषय झाला आहे. असे अत्याचार कधीही निषेधार्हच, पण त्यांचं प्रमाण काय, उपाययोजना काय आणि आरडाओरडा किती याचं मात्र ताळतंत्रच सुटल्याचं दिसतं.

आईबाप नोकरीला घराबाहेर जातात. दोघंही दहाबारा तास बाहेर असतात. मग मुलं परक्या प्रौढाकडे, पाळणाघरात ठेवण्याशिवाय पर्याय नसतो. बहुसंख्य लोकांना हे करणं भाग पडतं. आपल्या मुलांना आपण सांभाळू शकत नाही याची अपराधीपणाची भावना आईबापांच्या मनात सलत असते. या भावनेचं भांडवल प्रसारमाध्यमं आणि पाळणाघरांसारखे उद्योग करतात. लैंगिक विकृत प्रौढाच्या हाती तुमचं मूल सापडेल ही भीती या अपराधीपणाच्या पार्श्वभूमीवर मूळ धरू शकते. बीबीसीच्या दिवसभरातल्या कोणत्याही बातमीपत्रात बेपत्ता लहान मुलाची एखादी बातमी असतेच असते. त्यातून मग घबराट होते.

अमेरिकेत एकदा एक सर्वेक्षण प्रसारमाध्यमांनी लावून धरलं होतं. लैंगिक अत्याचारांच्या फिल्मस्‌मध्ये काम करायला भाग पाडलं जात असणाऱ्या लहान मुलांची संख्या वीस लाखाच्या आसपास आहे आणि या व्यवसायात कोट्यवधी डॉलर्सची उलाढाल होते, असं या सर्वेक्षणानुसार प्रसिद्ध झालं. या प्रकाराची मग चौकशी झाली. प्रत्यक्षात शंभराहून कमी मुलं या धंद्यात अडकली असावीत आणि दहा लाख डॉलर्सच्या आसपास उत्पन्न असावं, असं आढळलं. आपलं मूल रोज परक्याच्या हाती काही काळ सोपवायला लागणाऱ्या आईबापांच्या छातीत धडकीच भरावी, अशी या सर्वेक्षणाची पहिली बातमी होती. प्रत्यक्ष वस्तुस्थिती सांगणारा अहवाल फार नंतर आला तोपर्यंत व्हायचं ते सामाजिक-मानसिक झालंच होतं.

ब्रिटनमध्ये ७० ते ९० या दोन दशकांत मोटारीने शाळेत येणाऱ्या मुलांची संख्या चौपटीने वाढली. मुलाला सायकलने किंवा बसने शाळेत पाठविण्याची पद्धतच कमी झाली. कारण एकच - भीती. स्वतषहून एखाद्या खेळात भाग घेणाऱ्या मुलांची संख्या या दोन दशकांच्या काळात निम्म्यावर आली. मूल एकटं सायकलने गेलं तर अपघात होईल ही भीती, चालत गेलं तर कोणीतरी पळवेल ही भीती, आईबापांमधील ही असुरक्षिततेची भावना मुलंही आत्मसात करतात. त्यातून जग हे एकूण धोकादायक ठिकाण आहे, ही समजूत बळावते. धाडसी वृत्तीला वाव दिला जात नाही. 'टाळता येण्यासारखी शारीरिक इजा' अशी नवी संकल्पनाच वैद्यकीयशास्त्रात आता पुढे आली आहे. मुलांच्याबाबत तर सगळेच अपघात टाळता येण्यासारखे असतात आणि ते टाळायची जबाबदारी पालकांची असते, असं वारंवार बजावण्यात येतं. हा सिद्धांत एकदा मनावर बिंबला की मूल सायकलवरून गेलं की कधीतरी पडणारच, ही साधी बाब 'साधी' राहत नाही. तो पालकाचा अपराध होतो. मूल शाळेत धड प्रगती दाखवेनासं झालं, की पालकाला आपणच 'ढ' आहोत, असं वाटतं. सहज आणि शेकडो वर्षे मुलं वाढली, त्यांनी त्यांची मुलं वाढवली की उत्क्रांतीच नाकारण्यात येते. पालकत्वाचं 'शास्त्र' बनवलं गेलं आहे आणि या शास्त्रात सगळेच पालक नापास होतील, अशी काळजी घेतली गेली आहे. यातून पालकाचा आत्मविश्वासच जातो. बाहेर या विषयातल्या तज्ज्ञांची टोळी सल्ले देऊन पैसे उकळायला तयारच असते. पालकांच्या मनात मुलांविषयी असलेल्या भीतीला आणखी एक पदर आहे. ब्रिटनमध्ये आज एखाद्या मुलाचं वागणं शाळेतल्या शिक्षकाला थोडंसं जरी संशयास्पद

वाटलं, तर शाळेतून सरळ समाजसुरक्षा विभागाकडे परस्पर तक्रार जाते. पहिला संशय पालकांवर येतो. (पालकच मुलावर लैंगिक किंवा इतर अत्याचार करत असतील का?) समाजसुरक्षा विभागाला मोठे अधिकार असतात. प्रसंगी ते मुलाला ताब्यात घेऊ शकतात आणि त्या मुलाचा पालकांशी असलेला संबंध कायद्याने कायमचा संपवू शकतात. गैरसमजुतीमुळे किंवा मुलाच्या सांगण्याचाा विपरित अर्थ लावल्याने अशी उद्ध्वस्त झालेली कुटुंबं ब्रिटनमध्ये आहेत.

तात्पर्य, पालक दोन्हीकडून भीतीच्या कचाट्यात असतो. एका बाजूला मूल एखाद्या विकृताच्या हाती सापडेल ही अवाजवी पण निदान खरी म्हणता येईल, ही भीती; दुसऱ्या बाजूला मुलाला जरा शिक्षा केली आणि त्याने ते शाळेत, मित्रांना सांगितलं तर त्याचा भलताच अर्थ लावून आपल्यामागे सरकारी ससेमिरा लागेल ही दुसरी भीती.

भीती आणि 'दुकानदारी'!

पश्चिमेतल्या भांडवलशाही व्यवस्थेला या भीतीतून भांडवल मिळतं. उदा. आदर्श पालकत्वाचे क्लास ब्रिटनमध्ये चालतात. मुलाला जवळ कसं घ्यावं, स्पर्श कोठे टाळावा इथपासून सूचना दिल्या जातात. मानसशास्त्रही इथल्या भांडवलशाहीला उपकारक होतील असे शोध लावत असतं. एक ते तीन वर्षांच्या मुलांसाठी आणि त्यांच्या आईबापांसाठी विशेष प्रशिक्षणाचे वर्ग आता ब्रिटनमध्ये घेतले जातात. मुलावर सामाजिक जडणघडणीचे संस्कार या वयात झाले नाहीत, तर मूल मोठेपणी असंतुलित व्यक्ती बनू शकते, हा मानसशास्त्राचा शोध पालकत्वाच्या बाजारीकरणासाठी सोईचा आहे. वस्तुत: हे सरळ धंद्याचं गणित आहे.

परिणामत: आपल्याला तज्ज्ञांच्या मदतीशिवाय पालकत्व जमणारच नाही, प्रत्येक प्रौढ आपल्या मुलावर अत्याचार करायला टपलेला आहे, या भावना आता दृढ झाल्या आहेत. स्त्रीमुक्ती चळवळीत एका पिढीपूर्वी 'प्रत्येक पुरुष हा संभाव्य बलात्कारी असतो', असा थोर विचार पुढे आला होता. त्याचं हे या पिढीतलं रूप आहे. आज ब्रिटनमध्ये तुमचं मूल नाटकात काम करत असेल, स्पर्धेत भाग घेत असेल, तर फोटो काढायला सक्त मनाई असते. कारण तुमच्या मुलाबरोबर आणखी चार मुलं त्या फोटोत येणार. तुम्ही समजा ते इंटरनेटवर ठेवले, तर एखाद्या लैंगिक विकृतापर्यंत ते पोहोचू शकतील, मग त्यातला एखादा त्या मुलाच्या मागे लागणार... वगैरे थोडक्यात समाजच भीतीच्या अंमलाखाली एखाद्या लैंगिक विकृताच्या दृष्टीने मुलांकडे पाहू लागला आहे. हा या विकृतीचा विजय आहे. या विकृतीच्या विजयाचं आणखी एक उदाहरण म्हणजे तुम्हाला एखाद्या शाळेत मुलांबरोबर काम करायचं असेल, अगदी एखाद्या तासाचं भाषण द्यायचं असेल, तर सरकारकडून विशेष परवाना काढावा लागतो. तो प्रत्येक भाषणासाठी काढावा लागतो - अशासाठी की तुम्ही मुलांबरोबर काम करायला, त्यांच्यात मिसळायला 'सुरक्षित' आहात! हा परवाना मिळवण्याची फी तास-चाळीस डॉलर्स असते.

मध्यमवर्गीयांच्या मुलांबाबतच्या काळजीचा जसा व्यापारी गैरफायदा घेतला जातो, तसाच त्यांच्या आईबापांच्या विषयीच्या काळजीचाही घेतला जातो. आईबापांना वृद्धाश्रमात ठेवणं ही पश्चिमेकडे काळाची गरज झाली आहे. तरीही त्याबाबत त्यांच्या मुलांना अपराधी वाटतच असतं. या पार्श्वभूमीवर एखाद्या वृद्धाश्रमात पैसे कसे चोरतात, औषधं कशी वेळेवर दिली जात नाहीत, अशा गोष्टी टीव्हीवर दाखवल्या जातात. त्याही अशा पद्धतीने की, जणू सगळेच वृद्धाश्रम तसे असावेत. मग आपले आईबाप जिथं आहेत, तोही वृद्धाश्रम असाच असेल का, या शंकेने माणूस घायाळ होतो. अमेरिकेत वृद्धाश्रमाच्या संदर्भात खरा प्रश्न आहे, तो वृद्धांच्या उपासमारीचा. त्यांना तिथं खायलाच पुरेसं मिळत नाही. पण त्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष देत नाही. कारण प्रसारमाध्यमांनी वेगळाच मुद्दा पुढे आणलेला असतो.

प्रसारमाध्यमांचा वृद्धांच्याबाबत आणखी एक अनिष्ट परिणाम अमेरिकेत आढळून आला आहे. सतत हिंसक घटनांच्या बातम्या टीव्हीवरून बघायला मिळाल्याने वृद्धांचा असा ग्रह होतो की, बाहेरचं जग हिंसकच आहे. बरेचसे वृद्ध त्यामुळे घराबाहेर पडायलाच धजावत नाहीत. याचा त्यांच्या मानसिक, शारीरिक आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो. कारण बाहेर न पडल्याने ते जेवढा जास्त वेळ घरात घालवतात तेवढे जास्त घाबरतात.

स्वत:च्या आरोग्याची काळजी आणि रोगांची भीती ही तर या समाजात विश्वास न बसेल इतक्या अद्‌भुत थराला पोहोचलेली आहे. त्यामध्ये प्रसारमाध्यमांचा फार मोठा वाटा आहे. निरनिराळ्या रोगांच्या भीतीच्या लाटांमागून लाटा चालू असतात. चाळिशीनंतर दहातल्या एका बाईला स्तनाचा कॅन्सर होतो, असा अमेरिकेत दृढसमज झाला आहे. वस्तुत: अडीचशेतल्या एका बाईला तो विकार होण्याची शक्यता असते. अशा भीतीचा विपरीत परिणाम असा होतो की, जे घाबरतात ते चेक-अपही टाळतात. वेळच्यावेळी चेकअप केला आणि अगदी कॅन्सरची सुरुवात आहे असं निष्पन्न झालंच, तरी आजकाल त्या पायरीला कॅन्सर बराही होतो. पण चेक-अपमध्ये कॅन्सरचं निदान झालंच तर होणाऱ्या हालअपेष्टा, आर्थिक बोजा, मृत्यू या सगळ्याची भीतीच मानगुटीवर एवढी पक्की बसलेली असते, की चेक-अपही नको ही वृत्ती बळावते. त्यातून खरंतर रोगाचा धोका वाढतो.

काही वर्षांपूर्वीपर्यंत एच.आय.व्ही. आणि एडस्‌ची अशीच भीती पसरली होती. मग गाईचं मांस खाल्ल्यास होणाऱ्या मेंदूच्या दुर्धर विकाराची भीती आली. (बरीचशी मंडळी त्या भीतीने शाकाहारी झाली!) आता बर्ड फ्ल्यूची भीती आहे. राष्ट्रीय प्रसारवाहिन्यांवरून कोणत्या ना कोणत्या खाद्यपदार्थांत अमुक एक घटक सापडला, त्यानं कॅन्सर/मधुमेह/हृदयविकार होण्याची शख्यता आहे, अशा बातम्या सतत चालू असतात. त्यामुळे हे खाद्यपदार्थ बाजारातून अदृश्य होतात, त्यांची जागा नवीन पदार्थ घेतात आणि त्याच पटावर तोच खेळ चालू राहतो. औषधांना न जुमानणाऱ्या जंतुंमुळे जीवघेणा आजार होईल का? मोबाईल फोन वापरल्याने मेंदूचा कॅन्सर होईल का? अशा अनेक चिंता या समाजाच्या पाठीला लागल्या आहेत.

अमेरिकेत अशा बातम्यांचा फायदा घेऊन विकार झालेले लोक शोधणं हा एक व्यवसायच आहे. असे दोन-तीन पेशंट मिळाले की त्यांच्यावतीने खाद्यपदार्थ बनविणाऱ्या कंपनीवर नुकसानभरपाईचे महागडे खटले भरणारे वकील पुढे सरसावतात. कारण नुकसानभरपाई मिळाली तर त्यात त्यांची टक्केवारी ठरलेली असते. हाच खटल्यांचा प्रकार शाळांत, कॉलेजात, मनोरंजनाच्या ठिकाणी चालतो. एखाद्या घसरगुंडीवर खेळताना मूल पडलं तर घसरगुंडी बनवणाऱ्यावर, ती ठेवणाऱ्या शाळेवर, बागेवर लक्षावधी डॉलर्सचा खटला भरला जाऊ शकतो. शाळेत एखाद्या मुलाला शिक्षा केली तर पालक त्या शाळेवर, शिक्षकावर मानसिक क्लेशाबद्दल नुकसानभरपाईचा खटला भरू शकतात आणि भरताततही. त्यातून ही कटकटच नको म्हणून धाडसी खेळ शिकवणाऱ्या सोयी काढून तरी घेतल्या जातात किंवा कायदेशीर पळवाटा बंद करण्यात येतात - परिणामत: त्या महाग केल्या जातात. याबाबत गेल्या जूनमध्ये अमेरिकेतील खासदारांनी पत्रक काढून काळजी व्यक्त केली होती.

अशाप्रकारे वेगवेगळ्या भीतीच्या बागुलबुव्याला हा समाज शरण गेल्याचं दिसत आहे. लोकांच्या भीतींवर तज्ज्ञांची दुकानदारी चालत आहे. तज्ज्ञांकडे उठसूठ जाण्याची सवय लागली की, तेही एक व्यसन होतं. सरकारं, प्रसारमाध्यमं आणि तज्ज्ञ मंडळी लोकांमध्ये 'तुम्ही असहाय्य आहात' ही भावना रुजवत असतात. कुटुंबव्यवस्थेचा झालेला लय, चर्च तसंच कामगार संघटनांच्या प्रभावाचा अस्त या गोष्टींमुळे लोकांमध्ये असहाय्यतेची भावना रुजवणं सरकारं, प्रसारमाध्यमं आणि तज्ज्ञ या साखळीला सोपं जातं.

असहाय्य असणं हीच जणू नैसर्गिक अवस्था मानली जाते. ६०-७० च्या दशकात पाश्चिमात्य स्त्री-मुक्ती चळवळीला रोख स्त्री समर्थ आहे, पुरुषाच्या बरोबरीचीच नाही तर अधिक सक्षम आहे असा होता. आता सूर परत स्त्री अबला आहे आणि समाज गिधाडं आहे, हा आहे. हा पराभूत सूर केव या चळवळीतच नाही, तर सर्वत्र दिसून येतो. त्यामुळे राजकारण हे सामाजिक बदलाचं साधन मानलं जात नाही, कारण परिवर्तनाची उमेदच या समाजातून गेलेली आहे. दर सार्वत्रिक निवडणुकीत मागच्या निवडणुकीपेक्षा कमी लोक मतदान करतात. 'बदल करू, काही नवीन घडवू' अशा चळवळी तिथं जवळजवळ नाहीतच. त्यांची जागा फार मोठ्या प्रमाणात 'आम्ही मदत करतो' अशा स्वयंसेवी संघटनांनी घेतली आहे. उदाहरणार्थ तुम्ही व्यसनाधीन असाल, तर तो तुमचा दोष नाही, तुमची परिस्थिती, समाज दोषी आहे. तुमच्यासारखे खूप लोक आहेत, आम्ही तुम्हाला मदत करू. तुम्हाला असहाय्य वाटणं योग्यच आहे. एकटं वाटून घेऊ नका, आम्ही फुकट मदत करू', या तत्त्वावर या संघटना चालतात.

मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष

जनता राजकीयदृष्ट्या उदासीन असली की व्यक्तीच्या खासगी आयुष्यात ढवळाढवळ करायची सरकारची क्षमता तेवढीच वाढते आणि सरकारवर अवलंबून राहण्याची वृत्ती वाढते. सत्तेवर राहण्यासाठी सरकारला हे हवंच असतं. असं हे दुष्टचक्र आहे. या साऱ्याचा परिणाम असा होतो की, महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष द्यायला कोणाला फुरसतच राहत नाही. तत्त्वप्रणाली, आदर्शवाद या गोष्टी राजकारणातून बाहेर फेकल्या गेल्या आहेत. कल्पनांची दिवाळखोरी झाली की, देखाव्यावर भर दिला जातो. राजकीय पक्ष, समाजाचं धुरिणत्व ज्या मध्यमवर्गाने करायचं तो वर्ग आदर्शवादाबाबत गोंधळलेला दिसतो आणि उथळ दिखाऊपणा करतो. दुसऱ्या महायुद्धातील नरसंहार, त्यानंतरची हलाखीची आर्थिक स्थिती, नंतरचा सामाजिक संघर्ष या सगळ्याचाच या समाजाला विसर पडलेला दिसतो. त्यामुळे ब्रिटनमधले अगदी लोकसभेतले चर्चेचे विषय पाहिले तर हसावं का रडावं हे कळत नाही. मोकाट कोल्ह्यांना ठार मारणं कायद्यानं मंजूर असावं की नाही, शाळांमधलं भोजन कसं असावं, विद्यापीठांनी फी किती आकारावी या विषयांवर दिवस-दिवस चर्चा चालते. या समाजापुढे प्रश्न नाहीत असा याचा अर्थ नाही, तर राजकारणातले लोक समाजापासून किती विभक्त झाले आहेत, याचा हा नमुना आहे. स्थानिक, संकुचित आणि तात्कालिक प्रश्न एकविसाव्या शतकातले महत्त्वाचे प्रश्न म्हणून चार दिवस मांडले जातात आणि प्रसारमाध्यमं, राजकारण पुन्हा आपल्या रुळांवर सरकतं.

अमेरिकेत खरा प्रश्न गरीबीचा आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातली दरी प्रचंड प्रमाणात वाढते आहे. तिथले तळातले ४० टक्के लोक मागच्या दशकात होते त्यापेक्षा या दशकात जास्त गरीब झाले आहेत. ५० लाख ज्येष्ठ नागरिकांना घरी

खायला पुरेसं अन्न नसतं. पाचातलं एक मूल गरीबीत वाढतं. अडीच लाख मुलं बेघर आहेत. गरीबांमध्ये तुरुंगात असणाऱ्यांमध्ये कृष्णवर्णीयांचं प्रमाण प्रचंड आहे. अशा दरिद्रीकरणाच्या काळात हृदयविकार, कॅन्सर असे रोग वाढतात. गुन्हेगारी वाढते, लहान मुलांवर जास्त अत्याचार होतात, खून वाढतात. अंमली पदार्थांचा वापर वाढतो. मुळात इतक्या संख्येने समाजात गरीब असणं हेच अहितकार असतं. पण यासारख्या खऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्षच जात नाही. कारण सरकारला त्यात रस नसतो.

मूळ मुद्दा कसा दुर्लक्षिला जातो, याची दोन-तीन उदाहरणं पाहू. अमेरिकेत बंदुका कोणालाही सहज मिळू शकतात. हा तिथला आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे. अमेरिकेत खासगी नागरिकांकडे २५ कोटी बंदुका आहेत. दुकानांमधून ३ लाख बंदुका दरवर्षी चोरीला जातात. जगातल्या कित्येक देशांमध्ये सगळ्या नागरिकांकडे मिळून एकूण तीन लाख बंदुकाही नसतात. अमेरिकेत १२-१५ वर्षांची मुलं घरातून, शेजाऱ्याकडून बंदुका सहज हस्तगत करू शकतात. मग एखाद्याचा प्रेमभंग झाला, घरी भांडण झालं, शाळेत बाई रागावल्या की पोरगा बंदुका उचलतो आणि दुसऱ्या दिवशी शाळेत हत्याकांड होतं. अशा घटना अमेरिकेत अधूनमधून घडत असतात. 'अधूनमधून' हा शब्द महत्त्वाचा. कारण प्रसारमाध्यमं अशा घटना कशा प्रसिद्ध करतात ते पाहण्यासारखं असतं. बहुतेक भर त्या मुलाची मानसिक छाननी करण्यात असतो. तो कसा पोरका वाढला, सावत्र आईने कसा त्रास दिला असावा, तो कॉम्प्युटरवर कशा हिंसक गेम्स खेळत असे. वगैरे मग तज्ज्ञ येतात, टीव्हीवर तारे तोडतात आणि एकूण भयग्रस्त वातावरणात भरच पडते. दुसरा भाग असा की, अशी घटना कितीही क्वचित किंवा तुरळक असली तरी तिला प्रसिद्धी अशाप्रकारे दिली जाते की, अमेरिकन जनतेचा समज वस्तुस्थितीपेक्षा निराळा होतो. प्रत्यक्षात अशा एकूण हिंसक गुन्ह्यांच्या तेरा टक्के गुन्हे विशीच्या आतली मुले करतात. असा समज रूढ आहे की, ५० टक्के कृत्यं अशी मुलं करतात. खरी आकडेवारी अर्थातच लोकांपर्यंत पोहोचत तरी नाही, किंवा त्यावर त्यांचा विश्वास तरी बसत नाही.

मूळ मुद्दा बंदूक इतकी सहजरीत्या एखाद्याच्या हातात पडेलच कशी हा आहे. मात्र तो मुद्दा बाजूला राहतो. कारण अमेरिकन गन लॉबी प्रबळ आहे. बंदुका वापरणं हा मूलभूत हक्क आहे असं म्हणणारी ही लॉबी. ती राजकीय पक्षांना भरपूर मदत करते. त्यामुळे बंदुकींच्या वापरावर बंदी किंवा मर्यादित वापर या गोष्टी तिथं शक्यच नाहीत.

अमेरिका-ब्रिटनच्या प्रसारमाध्यमांमध्ये हिंसा या विषयाला सढळपणे स्थान मिळत असल्याचं दिसतं.

१९९५ साली अमेरिकेतील ओक्लाहोमा शहरात सरकारी इमारतीत बॉम्बस्फोट झाले. लोकांची पहिली उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती की, हे अरबांचं काम असावं (११ सप्टेंबरची घटना २००१ साली झाली.) हा तर्क नंतर खोटा ठरला. परकियांवर पहिला संशय हा या सामूहिक भीतीचा महत्त्वाचा परिणाम आहे.

सध्याच्या इंटरनेटच्या युगात स्फोटकं बनवण्याचे तंत्रज्ञान सहज उपलब्ध असतं. पाश्चिमात्त्य संस्कृतीविरुद्ध आकस असणारे अनेक मुस्लिम तरुण जगभर आहेत, युरोपातही आहेत. त्यांना हे तंत्रज्ञान, स्फोटकं बनवायला लागणारा माल सहज उपलब्ध होऊ शकतो. त्यासाठी जागतिक किंवा कोणत्याच संघटनेच्या पाठिंब्याची अशी खास जरूरी नसते. तसंच, त्यांची हिंसक कृत्यं करण्याची कारणं स्थानिक असतात. पण प्रसारमाध्यमं आणि सरकारं प्रत्येक अतिरेकी घटनेचा अल कईदाशी आणि त्याचा प्रमुख ओसामा बिन लादेनशी कटाक्षाने संबंध लावतात. जगाच्या कानाकोपऱ्यात कोठेही अतिरेकी कृत्यं झालं, की त्याची बातमी अर्ध्या तासात जगभर दृश्यस्वरूपात पोहोचते. यामुळे एक भ्रम निर्माण होतो. पाहणाऱ्याला वाटतं की, हा जागतिक कटाचा भाग आहे. स्थानिक फुटकळ माथेफिरूंना वाटतं की, ते एका जागतिक क्रांतिकार्याचे शिलेदार आहेत. सरकार ही उत्तरं आपल्या सीमेबाहेर शोधण्याला, प्रसंगी युद्ध लादण्याला प्रवृत्त होते. मग अतिरेकी कारवायांना आणखीच खतपाणी मिळतं आणि सरकारची उपाययोजनाही असफल ठरते. स्थानिक संभाव्य अतिरेक्यांशी संवाद साधणार कसा हा पश्चिम युरोपात तरी मोठा प्रश्न आहे. भीतीचं वातावरण सरकारनेच निर्माण केलं आहे. आधीच उल्हास त्यात फाल्गुनमास या म्हणीप्रमाणे ही नवी भीती आधीच हजारो कारणांनी घाबरलेल्या या समाजात पसरली. या भीतीच्या अमलाचा परिणाम म्हणजे आपले लोक, आपली जीवनपद्धती या भिंती पटकन उभ्या राहतात आणि संवादाची शक्यता दुरावते.

कार्ल पॉपर या तत्त्वज्ञाने 'मुक्त समाजाचे शत्रू' या शब्दांत साम्यवादाची संभावना केली होती. साम्यवादाची भीती दाखवून पन्नास-साठ वर्षे अमेरिका आणि युरोपने शीतयुद्धाच्या काळात आपल्या देशात आणि जगात भीतीचं साम्राज्य चालवलं. साम्यवाद तर गेला, पण भीतीच्या मायावी असुराने निरनिराळी रूपं धारण करून या समाजाला आज आपल्या मुठीत ठेवलं आहे.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❐